# छात्र प्रबोधन

सौर वैशाख शके १९४८ । वर्ष २६ अंक ८।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३४ अंक १०)
वार्षिक वर्गणी ₹ ४००। मूल्य ₹ ३०। पृष्ठे २८

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!



## मनामनातून आज गर्जू दे...

या पद्याची
चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

मनामनातून आज गर्जू दे राष्ट्रशक्तीची ललकारी
साद घाल तू निजबाहूंना, मुक्त नभी अन् घेई भरारी ।। धृ. ।।

गतकाळाचे डिंडिम का हो उगाच पिटता, उरिपोटी
या शतकाचे साहस थिजले? स्फूर्तीला का ही ओहोटी?
'भाळी मिरवीन वांझ वारसा' पुरुषार्थाची का ही कसोटी?
संभ्रम का हा? बुद्धिभेद का? विद्ध मनाला तूच विचारी ।। १ ।।

कोटिकरांची उधळण येथे, भूमी सुजला सुफला ही
ज्ञान भक्तीच्या संयोगाने, प्रखर बुद्धिने शोभविली
संघटनेची चिन्‌गारीही मनामनातच रुजलेली
का ह्याची विस्मृती? कशास्तव आत्मशक्तीला आव्हेरी? ।। २ ।।

विचार आणिक विवेक चित्ती, जागृत व्हावी विजिगीषा
डोळ्यांना परि भुलवित आहे, मोहमयी ही अभिलाषा
सत्ता, स्पर्धा, भोग देहिचा, अनिर्बंध ही असे लालसा
धुंद मनाला कशी उमजावी आर्त हाक आहे दारी ।। ३ ।।

देशच माझा-माझी भूमी-माझे दैवत येथील व्यक्ती
हिच्याचसाठी माझा कण-क्षण, हिच्याकारणी माझी शक्ती
हीच स्पंदने जाण हृदयीची, एक मुखी हो अभिव्यक्ती
संघटनेच्या विराट हस्ते ध्येयसिद्धीचा याग करी ।। ४ ।।

- वाच. अनघा लवळेकर

**पद्याचा अर्थ :** या देशातील प्रत्येक तरुणाच्या मनात असलेल्या सुप्त शक्तीला येथे साद घातली आहे. 'तुमचे कर्तृत्व फुलवून मुक्त आकाशात भरारी घ्या. आणि सगळ्यांनी एकत्र येऊन देशाच्या विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी सज्ज व्हा,' अशी चेतावणी येथे दिली आहे.

केवळ आपल्या इतिहासकालातील उज्ज्वल घटनांचा मोठेपणा मिरवू नका. आजच्या वर्तमानकाळात तुम्ही निष्प्रभ बसून राहू नका. आत्मपरीक्षण करा. इतिहासाचे स्मरण जरूर करा; पण केवळ त्यात रमून राहू नका. या सुजलां, सुफलां भूमीचा, इथे जन्मेलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींचा, त्यांच्या पराक्रमाचा जरूर अभिमान बाळगा; पण अशा अनेक कर्तृत्ववान व्यक्तींनी एकत्र येऊन इतिहास घडवला हे विसरू नका. विचार आणि सारासार विवेक बाळगून जग जिंकण्याची इच्छा मनी बाळगा. वरवरच्या सत्ता, स्पर्धा, मोह यात गुंतू नका.

हा देश, येथील व्यक्ती ही आपल्यासाठी देव आहे. त्यांच्या उद्धारासाठी माझी सर्व शक्ती मी पणाला लावीन. आम्ही सर्व एकत्र येऊन एकदिलाने, संघटित होऊन देशाच्या विकासाचे ध्येय साध्य करू. ही देशोद्धाराच्या तळमळीची ज्योत प्रत्येक तरुण मनात जागी व्हावी, ही कवयित्रीची आंतरिक तळमळ या पद्यातील शब्दाशब्दातून व्यक्त होते आहे.

**छात्र प्रबोधन**

ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे
कृतिशीलता जोपासणारे मासिक!

निव्वळ मासिक नव्हे!
विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!

मासिक। दिवाळी अंक। प्रकाशने।
कल्पक स्पर्धा। साहित्य मेळावे-संमेलने।

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन

**सौर वैशाख, शके १९४८। वर्ष २६ अंक ८**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ४०६ वा अंक, वर्ष ३४ अंक १०)

प्रकाशन दिनांक – सौर ११ वैशाख, शके १९४८/१ मे २०२६

## अंतरंग

२. पद्य... **मनामनातून आज गर्जू दे...** – वाच. अनघा लवळेकर
* पद्य चालीचे ध्वनिमुद्रण

४. **संवाद** – शिल्पा कुलकर्णी

५. कथा... **षटकार** – क्षितिज देसाई
* वाचा – ऐतिहासिक कथा – मुघल शाहजादा

११. ललित... **सुट्टी एके सुट्टी** – आश्लेषा महाजन
* ऐका – घाटाईची देवराई

१५. 'घेऊ प्रेरणा निसर्गापासून!' लेखांक १५...
**'बुद्धिमान' स्लाइम मोल्ड!** – डॉ. नंदा हरम

१७. चित्रपट परिचय ... **'क्रांतिज्योती विद्यालय...'** – मृण्मयी पाटसकर
* पाहा – चित्रपटाची झलक

१९. ललित ... **गोड गोवेकरांच्या आठवणी** – अक्षय वाटवे
* पाहा – साखळी(गोवा) येथील वीरभद्र उत्सवाची झलक

२३. माहितीपर ...**सागराच्या खोलीचे रहस्य** – सुरेश वांदिले

२५. कविता... **पक्षी** – अनंत जोशी

२७. **चित्राचे रसग्रहण करा**

**याशिवाय :** अनुभवसंपन्न सुट्टीसाठी व्यक्तिकार्य (१४), महाराष्ट्र दिन विशेष महाराष्ट्रातील काही रत्ने* (१८), जोडीकार्य स्पर्धा, तुम्हाला माहीत आहे का?(२२) स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे अभिनंदन, प्रतिसादी वाचकवीर व्हा! प्रश्न (२६)

**पानांखालील ओळी :** ५ मे बालकवी यांचा स्मृतिदिन! त्याप्रीत्यर्थ त्यांच्या काही काव्यपंक्ती

**माहितीपर :** पक्षीजगत

**अवश्य पाहा... ऐका...** * या लिंक्स QR कोडला जोडल्या आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.
त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करा.

**संपर्क पत्ता :** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५ **संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक**
शैलजा देशमुख

**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन
स्वाती ताडफळे
मल्हार अरणकल्ले

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**मुखपृष्ठ** – राहुल धामणे

**आतील चित्रे** – दीपक संकपाळ

**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
**वार्षिक :** ₹ ४०० (दिवाळी अंकासह),
+ स्पीडपोस्ट/कुरिअरने अंक पाठविण्यासाठी अतिरिक्त खर्च ₹ ३००
**या अंकाची किंमत :** ₹ ३०

**इंग्रजी द्वैमासिक अंक**
**मूळ वर्गणी :** ₹ ४००
**सवलतीत वर्गणी :** ₹ २००
(दिवाळी अंकासह ६ अंक वितरण खर्चासह)

**पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी व मासिकाच्या ऑनलाइन सभासद नोंदणीसाठी**
jpprakashane.org
या संकेतस्थळाला भेट द्या!!

आनंदाचे फिरती वारे, आनंदाने चित्त ओसरे ।
आनंदे खेळतो कसा रे, आनंदी पक्षी सारे ।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. किशोर पंडीत, चेंबूर, मुंबई ➢ डॉ. संजय गद्रे, धुळे ➢ श्री. वामन पारखी, पुणे
➢ श्री. अनिरुद्ध शहापूरकर, पुणे ➢ वाचस्पती सौ. वैशाली पाटील-देवरे, शिरपूर, जि. धुळे

## संवाद

प्रिय प्रबोधकांनो,

या अंकाचं मुखपृष्ठ पाहिलंत? किती वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी मुलं त्यांच्या सुट्टीत करत आहेत. ते करतानाचा त्यांचा आनंद व उत्साह, त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहताना दिसतो आहे. 'मोबाइल' विरहित घालवत असलेला वेळ सुद्धा किती आनंददायी असू शकतो हेच मुखपृष्ठातून सूचित होत आहे असं वाटतं. मुखपृष्ठ बघून मला परत एकदा माझ्या 'शाळकरी' वयात जावं आणि ती सगळी धमाल पुन्हा अनुभवावी असं वाटलं.

तुमची सुट्टी कशी सुरू आहे? *बोअरिंग* की एकदम चैतन्याने भरलेली, उत्साहपूर्ण? 'सुट्टीत, वेळ मिळाला की, अमुक गोष्टी नक्की करून पाहू', अशी यादी शाळेच्या धावपळीत आणि विशेषत: परीक्षेच्या काळात तुमच्या मनात घोळत असते, हो नं! त्यातल्या कोणत्या गोष्टी या सुट्टीत सुरू केल्या, कोणत्या पूर्ण होण्याच्या टप्प्यावर आहेत? मागील महिन्याच्या वासंतिक विशेषांकात दिलेल्या 'हस्तकला' कृती पुस्तिकेतल्या कोणत्या 'कलाकृती' करून पाहिल्या, मित्र-मैत्रिणी, भावंडांपर्यंत पोहोचवल्या? तुमचा सुट्टीतला कितीवेळ ठरवून तुम्ही *स्क्रीन टाईम* शिवाय घालवला? सुट्टीत कोणते वेगळे अनुभव घेतलेत हे सगळं सगळं जाणून घ्यायची आम्हाला देखील उत्सुकता आहे. तेव्हा हे सर्व आम्हाला *मेल* करून कळवायला विसरू नका!

शाळेच्या सगळ्या धावपळीत, धकाधकीत 'आवडत्या', 'भावलेल्या' व काही 'खुपणाऱ्या' गोष्टींवर तुमच्या जवळच्या व्यक्तींना प्रतिसाद द्यायचा तुमच्याकडून राहून जातो. कधी वेळेअभावी, कधी स्वतःचा संकोची स्वभाव किंवा एकूणच व्यक्त होण्यातला आळस इत्यादी गोष्टींमुळे तुमच्या मनातले विचार, मतं मनातच राहातात. सुट्टीचा काही खास वेळ प्रतिसाद देण्यासाठी राखून ठेवता येईल का? मित्र-मैत्रिणींमधले भावलेले कलागुण, त्यांनी मिळवलेले यश, त्यांनी मिळवलेली बक्षिसे, निवडलेली वेगळी वाट, एखाद्याचा/एखादीचा मदत करण्याचा स्वभाव इ. विषयी त्याला/तिला आवर्जून 'दाद' द्या! त्याचं/तिचं कौतुक करणारा एखादा दूरभाष किंवा प्रत्यक्ष भेटून सांगणं आणि शुभेच्छा देणं, असाही प्रतिसाद देता येईल. दिलखुलास दिलेल्या अशा प्रतिसादांमुळे मैत्रीचं, एकमेकांतील विश्वासाचं नातं घट्ट होतं, फुलत जातं.

छात्र प्रबोधन अंकातील अनेक कथा, लेख तुम्हाला भावतात. अंकाची मुखपृष्ठे, आतील चित्रे आवडतात; पण हे सांगण्यासाठी तुम्ही लेखक/चित्रकारांशी किती वेळा थेट संपर्क करता? स्वतःच्या व्यग्र दिनक्रमातून वेळ काढून खास तुम्हा कुमारांसाठी लेखक/चित्रकार लेखन करतात/चित्रं काढतात. तुमच्या मनात कल्पनांची बीजं पेरतात. कधी स्वप्नांची सैर घडवतात, तर कधी वास्तवाचं भान देतात. तुमची साहित्य अभिरुची वाढवतात. तुम्हाला भावलेल्या अशा किमान ५ लेखक/चित्रकारांना तुम्ही या सुट्टीत प्रतिसाद देणार का?

तुम्हाला भवताली अनेक चुकीच्या गोष्टी घडताना दिसतात. त्या चुकीच्या गोष्टी तुम्हाला खुपतात देखील! पण त्याबाबतचं तुमचं मत, भावना बऱ्याच वेळा तुमच्या मनातच राहातात. त्याबाबत कोणाला सांगायचं असाही प्रश्न पडतो. तेव्हा आपल्या पालकांशी, ताई-दादाशी, शिक्षकांशी यासंबंधी बोला. अगदी 'छात्र प्रबोधन'ला *मेल* करून देखील कळवा. त्याविषयी काय तोडगा काढता येईल, अशी चर्चा मित्र-मैत्रिणींमध्ये करा! या सुट्टीपासून तुम्हाला'भावलेल्या' व 'खुपलेल्या' अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टी त्या-त्या व्यक्तींपर्यंत पोहोचवून प्रतिसाद देणार ना?

आणि हो, छात्र प्रबोधन मधून केलेल्या आवाहनांना देखील प्रतिसाद द्यायला विसरू नका! व्यक्त व्हा!! प्रतिसादी व्हा!! संवादाच्या प्रतीक्षेत...

**तुमची,**
**शिल्पाताई**

**जाणून घ्या पक्षीजगत - छोटी टिबुकली :** हा पाणथळ जागी राहणारा अत्यंत लहान आकाराचा पक्षी आहे. याला मराठीत चबका असेही म्हणतात. हे पक्षी प्रामुख्याने तलाव, नद्या आणि दलदलीच्या ठिकाणी जोडीने किंवा थव्यात राहतात.

**वार्षिक देणगीदार -** ➢ सौ. किरण मुसळे, सांगली ➢ श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे ➢ श्री. श्रीपाद कुलकर्णी, पुणे ➢ सौ. स्नेहा भंडारे-जोशी, पुणे ➢ डॉ. प्रतीक रवींद्र सेठिया, पुणे ➢ श्री. नागेश साने, पुणे

# षटकार

– क्षितिज देसाई

कथा

**आज मृद्‌गंधाला *क्रिकेट कोचिंगला* निघायला उशीर झाला. पटपट आवरून निघालेल्या मृद्‌गंधाला काय माहिती का, एकदम विचित्र, अस्वस्थ वाटू लागलं, तिला अचानक क्रिकेटची भीती वाटू लागली. क्रिकेट वर नितांत प्रेम असणाऱ्या मृद्‌गंधाला क्रिकेटची अशी भीती का वाटली असावी? काय रहस्य दडलंय त्या मागे?**
**जाणून घेऊ या सोबतच्या विज्ञान कथेतून...**

माझा दिनक्रम तसा ठरलेला असतो. सकाळी शाळा. शाळेतून आलं की दुपारचं जेवण. आई किंवा मदतनीस मावशी सकाळी स्वयंपाक करून ठेवतात. मी आल्यावर ते गरम करून निवांत जेवते. मग अभ्यास. अभ्यास आटोपला की माझा सगळ्यात आवडीचा भाग संध्याकाळचं *क्रिकेट कोचिंग!*

*कोचिंगला* उशिरा पोहोचलं की *कोचमॅम* रागवतात. सहा वाजता काहीही करून तिथं पोहोचायलाच हवं; म्हणून मी नेहमी अभ्यास पटापट आटोपून लवकर निघायचा प्रयत्न करते.

पण आज काय माहीत का, घड्याळाकडे लक्षच गेलं नाही. मन अभ्यासात अगदी रमून गेलं होतं. बराच वेळ झाला, अभ्यासाचं पुस्तक समोर होतं. *मोबाइलच्या रिंगटोनने* तंद्री मोडली माझी. दिव्याचा *फोन* होता. मी *स्वाईप* करून *फोन* उचलला.

''कुठं आहेस? अगं, आम्ही सगळे वाट पाहतोय तुझी!'' ती जवळजवळ ओरडलीच.

तेव्हा कुठं माझ्या डोक्यात प्रकाश पडला.

''बापरे! निघालेच हं मी! *कोचमॅमना* सांग'', मी घाईघाईत म्हटलं आणि *फोन* ठेवला.

पुढची सगळी कामं अक्षरशः धावतच केली. *किट* तर आधीच तयार होतं. रोज सकाळीच मी *किट* भरून तयार ठेवते. पटकन कपडे बदलले. *किटचं* ओझं खांद्यावर घेतलं– एक मिनिट... माझ्या प्रिय *क्रिकेट किटला* मी आज ओझं का म्हणतेय? ओझं कसं असेल ते? इतक्यात *बेल* वाजली.



आई *ऑफिसातून* आली.

''मृदू, कुठं चालली आहेस?'' आईनं विचारलं.

*''क्रिकेट कोचिंगला''*, मी जेवढ्यास तेवढं उत्तर देऊन, तिचं प्रत्युत्तर न ऐकता बाहेर पडले. नाहीतर पुन्हा तिची अभ्यासावरून काहीतरी बोलणी खावी लागली असती.

नेहमीप्रमाणे *लिफ्टची* वाट न बघता, धडाधड जिने उतरायला सुरुवात केली. डोक्यात खेळाचेच विचार... 'कधी एकदा मी त्या मैदानावर पोहोचतेय आणि मस्त बॅट काढून एक दिमाखदार षटकार लगावतेय...' आणि काय माहीत का, एकदम विचित्र, अस्वस्थ वाटू लागलं. दडपण आल्यासारखं वाटलं.

'कशाला जातोय आपण *क्रिकेटला?* एवढा भयानक खेळ.. दुखापत झाली तर?'

हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणांच्या मखमालीचे ।
त्या सुंदर मखमालीवरती, फुलराणी ही खेळत होती ।।

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे ➢ सौ. वर्षा कुलकर्णी,पुणे ➢ श्री. गौरव मोडक, ठाणे ➢ डॉ. सतिशचंद्र गोरे, पुणे ➢ हरताळकर हॉस्पिटल, डॉ. विकास हरताळकर, चोपडा, जि. जळगाव

खरं तर हे असे विचार का आले, मला कळतच नव्हतं! *क्रिकेट* मला का 'भयानक' वाटेल?

***

मागच्या वर्षी म्हणजे आठवीच्या उन्हाळी सुट्टीत मी आईशी भांडून *क्रिकेट कोचिंगची* परवानगी घेतली होती.

त्या दिवशी आईच्या *ऑफिसात* त्यांच्या विभागाची पत्रकार परिषद होती. विभागाच्या कोणत्यातरी नव्या औषधाबद्दल होती वाटतं. आई विभागप्रमुख असल्यानं ती *लीड* करत होती परिषद. मला सुट्टी असल्यामुळे, आईला सोबत द्यावी म्हणून मीही गेले. मात्र, मला त्या परिषदेत रस नव्हता. मी थोडावेळ ऐकलं सुरुवातीला; आणि नंतर *फोनवर* एक जुनी *मॅच* लावून पाहत बसले.

आई *स्टेजवरून* खाली आली तेव्हा खुश होती; कारण त्या परिषदेला चांगला प्रतिसाद मिळाला होता. म्हणून ती संधी साधून मी सहज *क्रिकेट कोचिंगचा* विषय काढला.

आई तेव्हा रागावली. म्हणाली, ''मजामस्ती खूप झाली. अभ्यासाची वर्षं आहेत ही''.

''पण मला आवडतं ना गं *क्रिकेट!*''

''त्यासाठी *कोचिंग* वगैरे लावायची काही गरज नाही. त्यात *करिअर* आहे का काही?''

''मग तुला काय वाटतं सर्वांनी तुझ्यासारखं '*न्यूरो इंजिनिअर*'च व्हायचं?'' मी फटकन बोलले.

''मृद्गंधा! उलट बोलू नकोस. मी म्हणतेय, ज्यात काहीतरी संधी मिळेल असं शिक. *स्पोर्ट्स* काही *सिरियस* गोष्ट आहे का? दीडशे कोटी लोकांचा देश आहे आपला. त्यात अकरा जणींना *सिलेक्ट* करणार *टीममध्ये*. त्यात लागणार आहे का आपला नंबर?''

''आणि *करिअर* असायलाच हवं का? मी नुसतं आवडीसाठीही खेळू शकते ना आई!''

''मग त्यात फालतू वेळ का वाया घालवायचा?''

आईचं म्हणणं तिच्या बाजूनं बरोबर होतं, हे मला कळत होतं. चांगल्या करिअर अभावी माझी हेळसांड होऊ नये अशी तिची इच्छा असावी. मी लहान असतानाच बाबा गेले. मला मोठं करण्याची जबाबदारी तिच्या एकटीवर पडली. बाबांच्या जागेवर अनुकंपा तत्त्वावर आईला नोकरी मिळू शकत होती. मात्र, त्यासाठी *बायोमेडिकल* पदवी आणि *न्यूरो इंजिनिअरिंगची* पदव्युत्तर पदवी गरजेची होती. अनेक नातेवाईक म्हणत होते, ''या वयात कुठं शिक्षण घेणार? आम्ही थोडी मदत करतो''.

पण अशा मदतीवर अवलंबून राहणं तिच्या स्वभावातच बसणारं नव्हतं. आपल्याला हवं ते काहीही करून मिळवायचं हा तिचा स्वभाव! आईने मग जिद्दीने तिचं शिक्षण पूर्ण केलं. अनेक परीक्षा दिल्या. *न्यूरो इंजिनिअरिंगची* पदव्युत्तर पदवी घेतली.

मला आठवतंय, अनेक रात्री आम्ही दोघीही एकत्र अभ्यास करत बसायचो. मी माझा *होमवर्क* करायचे आणि आई तिचा *न्यूरो इंजनिअरिंगचा* अभ्यास. सुरुवातीला तिचा *स्टायपेंड* कमी होता. त्यात तिनं माझे अनेक हट्ट पुरवले. तिच्या परीनं खूप लाड केले.

**ही कथा पूर्ण वाचण्यासाठी jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा किंवा वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा! आणि घरपोच अंक मिळवा.**

**जाणून घ्या पक्षीजगत - भारतीय पाणकावळा :** हा *फॅलॅक्रोकोरॅसिडी* कुलातील एक पाणपक्षी असून, तो भारतासह आशिया खंडात गोड्या पाण्याच्या तलाव, नद्या आणि दलदलीच्या ठिकाणी मोठ्या समूहाने आढळतो.

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. स्मिता चावरे, ऐरोली, नवी मुंबई ➢ श्री. अमोल लिमये, पुणे ➢ डॉ. जयेश रहाळकर, पुणे ➢ कु. राधा श्रावण हर्डीकर, पुणे ➢ श्री. विनय गडीकर, पुणे ➢ श्री. केदार वसंत जोशी, पुणे

# सुट्टी एके सुट्टी (सुट्टी दुणे?!)



ललित

– आश्लेषा महाजन

परीक्षेचा शेवटचा *पेपर* लिहितानाच मला सुट्टी लागल्यासारखं वाटतं. सुट्टी म्हणजे धमाल आनंदाचा काळ! पुढच्या इयत्तेत जाण्यापूर्वीचा टप्पा. तिथं एक रिंगण पूर्ण होतं. काही दिवस उनाडक्या करायच्या आणि मग पुढच्या इयत्तेचं रिंगण!

मोठी माणसं त्यांच्या बालपणीच्या सुट्टीच्या आठवणी सांगतात, तेव्हा गंमत वाटते. एकदा आजी अशीच आठवणींशी खेळत होती. आजीनं एक आठवण सांगायची आणि त्यावर मी वेगळंच भाष्य करायचं– 'कंसातल्या वाक्यांसारखं' असं आमचं चालू होतं.

**आजी –** सुट्टीत किनई आम्ही मामाच्या गावाला जायचो! *(**मी –** आता मामा, मावशी, काका, आत्या असं कोणीच गावाला राहात नसतात. असले चुकून, तरी ते आम्हाला बोलावत नाहीत. तेच सुट्टीत काश्मीरला किंवा परदेशात जातात. आम्हीही त्यांना बोलावत नाही.)*

**आजी –** सुट्टीत दुपारभर आम्ही *कॅरम*, पत्ते, सापशिडी, नवा व्यापार खेळायचो. ग्रंथालयातली पुस्तकं वाचायचो. *(**मी –** आता कॅरम, पत्ते वगैरे आम्हाला 'बोअर' होतात. आम्ही मोबाइलवर पब्जी खेळतो, रील्स् बघतो! आम्ही पुस्तकं वाचत नाही; पण भरपूर 'बघतो' 'ऐकतो'.)*

**आजी –** आम्ही चारनंतर पटांगणावर खेळायचो– आट्यापाट्या, डबडा ऐसपैस, लपाछपी, कधी खो-खो, दोरीवरच्या उड्या फुल्ल धम्माल! *(**मी –** असले खेळ? वैताग नुसता. आता शहरात पटांगणं, मोकळ्या जागा उरल्या नाहीत. ज्या आहेत, तिथं खेळायचं, तर आई-बाबांनाच आमची ने-आण करावी लागेल; पण नोकरीमुळे त्यांना कुठं वेळ आहे?)*

**आजी –** कधी आम्ही पालकांबरोबर *ट्रीपला* जायचो–महाबळेश्वर, माथेरान, वेरूळ अजिंठा किंवा एखाद्या लग्नकार्याला जायचो. *(**मी –** हं... ही सगळी ठिकाणं आम्ही शाळेच्या सहलीतच पाहिलीयेत. आम्हाला पालकांबरोबर 'बोअर' होतं. आमचा 'कनेक्ट' होत नाही! लग्नकार्य तर सर्वांत बोअर प्रकार!)*

**आजी –** आम्ही सुट्टीत घरीच *पॉट आईस्क्रीम* करायचो. आजी कुरडया, पापड, पापड्या करायची, तिला आम्ही मदत करायचो. वाळवणाची राखणदारी करायचो. त्याबदल्यात आम्हाला चित्रपटगृहात एक चित्रपट, एकदा *हॉटेलमध्ये* डोसा, इडली मिळायची.

शिवाय आईने शिवलेला एक *फ्रॉक*. यातच सुट्टी संपायची.

*(**मी –** हम्म! हे सगळे जुन्या 'कृष्णधवल' चित्रपटासारखं आहे. ऐकायला छान वाटतं; पण आजच्या काळाशी काहीच जुळत नाही.)*

**आजी –** सुट्टीत आम्ही 'खरी कमाई' करायचो. वाळा, उदबत्त्या विक्री करायचो. एखाद्या ग्रंथालयात, संस्थेत काही तास काम करायचो.

**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**

कोठुनि येते मला कळेना, उदासीनता ही हृदयाला ।
काय बोचते ते समजेना, हृदयाच्या अंतर्हृदयाला ।।

वार्षिक देणगीदार - ➢ एक हितचिंतक, पुणे ➢ श्री. अमित गाडगीळ, पुणे
➢ श्री. निखिल आपटे, पुणे ➢ श्री. मुकुंद कुवर, बोरीवली, मुंबई

‘घेऊ प्रेरणा निसर्गापासून!’ लेखांक १५

# ‘बुद्धिमान’ स्लाइम मोल्ड!

– डॉ. नंदा हरम

‘‘निशांत, ए निशांत... इकडे ये ना लवकर,’’ अभय निशांतला जोरात हाका मारत होता.

निशांत धावतच आला आणि म्हणाला, ‘‘काय घडलंय एवढं...?’’

अभय म्हणाला, ‘‘संध्याकाळी बाबा माझ्यासाठी प्रयोगाचं साहित्य आणणार आहेत. मी एक प्रयोग करून पाहाणार आहे. तूही ये’’.

निशांत लगेच म्हणाला, ‘‘हो रे... मी नक्की येईन. तुझा उत्साह बघून, माझी जिज्ञासा वाढली आहे. पण कोणता प्रयोग, ते तर सांग ना मला’’.

अभय म्हणाला, ‘‘अरे माझ्या बाबांनी ‘स्लाइम मोल्ड’विषयी नुकतीच मला रंजक माहिती दिली. त्याबाबतचाच तो प्रयोग आहे’’.

***‘‘स्लाइम मोल्ड ही काय भानगड आहे?’’*** *निशांतनं उत्सुकतेनं विचारलं.*

**‘‘स्लाइम मोल्ड हा दमट, सेंद्रिय वातावरणात आढळणारा एक मेंदूहीन, एकपेशीय जीव आहे’’**. अभय म्हणाला.

‘‘म्हणजे बुरशी का?’’ निशांतची शंका.

‘‘तीच तर गंमत आहे. तो बुरशी, वनस्पती किंवा प्राणी नसून एकपेशीय जीव आहे, मृतोपजीवी म्हणून कार्य करतो. कुजणाऱ्या वनस्पतीजन्य पदार्थांवर जगतो’’.

‘‘पण त्याला ओळखायचं कसं?’’

अभय अगदी माहितगाराच्या आविर्भावात म्हणाला,

‘‘अनेकदा कुजणाऱ्या लाकडावर नारंगी, पिवळ्या अशा तेजस्वी रंगाच्या जेलीसारख्या चिकट पदार्थाच्या रूपात तो आढळतो’’.

‘‘त्याचं काही खास वैशिष्ट्य आहे का?’’

‘‘हो, सांगतो ना. **याचा बाह्यपटल प्रसरण आणि आकुंचन पावत असतं. हे होत असताना त्याच्या पेशीतील द्रव्यामुळे (cytoplasm) त्याची हालचाल होते. मृतोपजीवी जीव, जीवाणू खाण्यासाठी हा सायटोटलझ्मिक प्रवाह १ मिमी/सेकंद या वेगाने वाहतो. मेंदू नसतानाही दिशा शोधणं, सापळ्यातून सुटणं आणि चक्रव्यूहातील कोडी सोडवणं यांसारख्या संज्ञानात्मक क्षमता दर्शवितो. हे सारं मी ‘फायसारम पॉलीसेफॅलम’ या विशिष्ट जातीविषयी बोलतो आहे’’**.


‘‘हा *मोल्ड* हानीकारक असतो का?’’

‘‘नाही. पाळीव प्राणी, वनस्पती किंवा मानवासाठी तो अपायकारक नसतो,’’ अभय उत्तरला.

‘‘या *मोल्डविषयी* तुला नेमकं काय सांगायचं आहे?’’ निशांत विचारू लागला.


**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**


आकृती १



स्लाइम मोल्ड — टोकियो नेटवर्क

दिव्य चैतन्ये, धुंद दिशा दाही ।
स्वप्न कवीचे, प्रज्वलित तेथे होई ।।


वार्षिक देणगीदार - ➢ सौ. सुचेता सोनी, पुणे ➢ श्री. समीर रिसबूड, पुणे
➢ श्री. संजय चावरे, ऐरोली, नवी मुंबई ➢ श्रीमती शिरीषा खरे, गिरगाव, मुंबई

## पाहिलेच पाहिजे असे काही




# ‘क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम’

**– मृण्मयी पाटसकर**

‘शाळा’ हा शब्द उच्चारल्यावर तुम्हाला काय आठवतं? आवडते शिक्षक, मित्र-मैत्रिणी, आधीच्या इयत्तांमधील आठवणीतले काही खास प्रसंग, मिळालेली बक्षिसे, सहली, शिक्षकांचं रागावणं इ. हो नं..!

**‘क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम’** हा चित्रपट शाळेविषयी एक स्मरणरंजन आहे, जे थेट दर्शकांच्या हृदयाला भिडतं. त्याचबरोबर आपल्या मातृभाषेचं-विशेषतः मराठी भाषेचं महत्त्व आणि मराठी माध्यमाच्या शाळांचं घसरत जाणारं प्रमाण, हा या चित्रपटाचा मुख्य विषय आहे. १ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात एक स्थान निर्माण केलं आहे, करत आहे.

‘क्रांतिज्योती’ मराठी शाळेचे काही माजी विद्यार्थी अनेक वर्षांनंतर एकत्र येतात. किंबहुना त्यांना शाळेत बोलवलं जातं. अनेक वर्षांनंतर शाळेत एकत्र आल्यामुळे त्यांच्या शाळेसोबतच्या सर्व गोड आठवणी पुन्हा ताज्या होतात. त्यावेळी त्यांनी एकत्र घालवलेला वेळ, शाळेबाहेरचं खाऊचं दुकान आणि शाळेमागील भुताच्या गोष्टी!

आज आपापल्या क्षेत्रांत काहीतरी कर्तृत्व गाजवलेले, नाव कमावलेले, हे सर्वजण असतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शाळेचा, शिक्षकांचा महत्त्वाचा वाटा असतो. शाळेत आल्यावर त्यांच्या लाडक्या शाळेवर आलेलं संकट त्यांना कळतं. आता त्यांची शाळा बंद होण्यापासून वाचवण्यासाठी ते माजी विद्यार्थी प्रयत्न करतात. मदतीसाठी सरकारकडे जातात; तिथे पण त्यांना यश येत नाही.

‘शाळा’ प्रत्येकासाठी आठवणींचा खास खजिना असतो. शाळा हे असं ठिकाण आहे, जिथं आपण बाहेरच्या जगतातलं पहिलं पाऊल टाकतो. शाळेच्या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात पहिल्यांदा मंचावर उभं राहून केलेलं सादरीकरण, फसलेले प्रयोग किंवा आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा जिंकणं अशा कितीतरी गोड-आंबट अनुभवातून आपण घडत असतो.

दुर्दैवाने आज ‘शिक्षणक्षेत्र’ हे पैसे कमवून देणारा व्यवसाय झाला आहे. ‘क्रांतिज्योती’ शाळा ही अत्यंत कमी खर्चात विद्यार्थ्यांना क्रमिक अभ्यासाबरोबरच अनुभवशिक्षण देत होती. त्या शाळेच्या जागी *इंटरनॅशनल स्कूल* उभी करण्याचा घाट काही राजकारणी मंडळी घालतात. तिथं कदाचित आधुनिक सोयीसुविधा नसतील; पण त्या शाळेत दिलं जाणारं ‘शिक्षण’ अस्सल होतं.

**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**

सुंदर झाडी पाणद मोठी, शीतल छाया तीत पडे ।
वाढुनी वेली फुगडी झाली, त्यांतुनि ओढा वाहतसे ।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. दिनेश सोनसळे, पुणे ➢ डॉ. संतोष काकडे, पुणे ➢ श्री. अतुल मराठे, पुणे ➢ श्री. राहूल पाटील, पुणे ➢ सौ. संजीवनी शरद जोशी, ठाणे



# गोड गोवेकरांच्या आठवणी



ललित

– अक्षय वाटवे

**काहीच कारण नसताना मला अनेकदा गोवेकरांच्या आठवणींचं भरतं येतं. मग मिरामारच्या लाटां जशा किनाऱ्यावर घुसळी मारतात, तसे कित्येक प्रसंग आणि भेटलेली गोवेकर मंडळी मनात घुसळी मारत राहतात**

**मा**झ्या आईचं माहेर गोवा! त्यामुळे मी बालपणीच्या सुखाच्या काळातले कित्येक दिवस–महिने गोव्यात घालवले आहेत. पाटाच्या पाण्यातून चालत जाताना होणारा छपकछपक आवाज, फणसाचा डिंक, बोंडू खाऊन फुललेली तोंडं, करवंदीच्या काट्यांनी ओरबाडलेले हात, सायकल शिकताना फुटलेली ढोपरं, *पाइप* लावून तासन्‌तास केलेल्या अंघोळी, *कॅरम*चे दिवसदिवस चालणारे डाव, पालथी घातलेली वेगवेगळी ठिकाणं, एक रुपया आणि दोन रुपयांची *पेप्सी, आइस्क्रीम्स* किती तरी...

आयुष्यात गोव्यात आजोळ असल्याचं सुख अवर्णनीय आहे. गारांचा पाऊस पडावा आणि हरखून जायला व्हावं, तसं आठवणींचं आभाळ भरून राहिलेलं आहे. कोणी बोट लावायची खोटी...

सुर्ल, पणजी, वाळपाई, सत्तरी, अल्तिनो, नास्नोडा, परवरी, पत्रादेवी, तुये, मांद्रे, मडगाव, डिचोली, नगरगाव आणि ही यादी वाढतच जाईल, इतकी या भागातली गावं मी फिरलो आहे. बहुतेक वेळा मामेभावाच्या *स्कूटर*वर मागं बसून, कधीकधी त्याच्या कमरेला घट्ट मिठी मारून, तर कधी झोपूनदेखील!

**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा किंवा वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा! आणि घरपोच अंक मिळवा.**

हीवेलींची सुंदर सदने, रत्न-मण्यांनी भूषविली ।
सौभाग्येही वनदेवींनी, तुझिया चरणी अर्पियली ।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. कौस्तुभ हळबे, पुणे ➢ श्री. प्रवीण साळी, धुळे ➢ सौ. मृण्मयी पाटणकर, पुणे ➢ श्री. नरेंद्र कुलकर्णी, पुणे ➢ श्री. शशिशेखर चौगुले, बंगळुरू, कर्नाटक

माहितीपर

# सागराच्या खोलीचं रहस्य!

– सुरेश वांदिले

मार्गारिट मांजरमावशी आणि रॉबिन्सन उंदीरमामा, परवा पुन्हा मुंबईत शाहरुखच्या मन्नत बंगल्याजवळच्या *बँडस्टँडला* गेले होते. तिथून त्यांना समुद्राच्या लाटांकडे बघण्यात खूप मज्जा येई. किनाऱ्याकडे येणाऱ्या लाटा ते दोघंही मोजत बसत. याठिकाणी मनुष्यप्राणी मोठ्या संख्येनं समुद्र बघायला येत. काहीजण समुद्रकिनाऱ्यावर आलेल्या बाकांवर बसत. काहीजण दगडांवर जाऊन बसत, तर काहीजण समुद्राच्या पाण्यात जाऊन खेळत. तिथं येणारी ही मंडळी पुडक्यातलं काहीना काही बकाबका खात. खाणं झालं की ते पुडकं तसंच फेकून देत. त्यात शिल्लक राहिलेले *पॉपकार्न*, शेंगदाणे, *चिप्स* असं काहीबाही *रॉबिन्सन* आणि *मार्गारिटला* खायला मिळे. अशी चंगळ करता येत असल्यानंच ते दोघंही मालकीणबाई बाहेरगावी गेल्या की पुन्हापुन्हा इकडे येत.

आज खादाडी करत समुद्राच्या लाटा मोजत असताना, *रॉबिन्सनला* दूरवर एक जहाज जाताना दिसलं. ते अगदी ठिपक्यासारखं दिसत होतं. थोड्यावेळानं जहाजाचा ठिपका दिसेनासा झाला.

''बापरे!'' मामाच्या तोंडून उत्स्फूर्तपणे निघून गेलं.

''काय झालं *रॉबू?''* मावशीनं विचारलं.

''अगं, ते जहाज समुद्रात बुडालं ना''.

''अरे, *रॉबू* ते जहाज बुडालं नाही, तर इथून खूप दूर निघून गेलं''.

''पण काय गं मावशे, जहाज जसं पाण्यावर चालतं तसं आपणही चालू शकतो का?''

''रॉब्या, आपण काय किंवा हा मनुष्यप्राणी काय कुणालाच पाण्यावर चालता येत नाही. समुद्र फार खोल असतो. इथं किनाऱ्यावर वाळू असल्यानं मनुष्यप्राणी चालू शकतो. आपणसुद्धा पळापळी करू शकतो; पण जसंजसं किनाऱ्यापासून दूर जाऊ, तशी समुद्राची खोली वाढते. वाळू संपते. मग सर्वत्र पाणीच पाणी!''

''मावशे, अगं या उपद्व्यापी मनुष्यप्राण्यानं समुद्र जास्तीत जास्त किती खोल असेल, याचा नक्कीच शोध घेतला असेल ना?''

''तुला रे त्याच्याशी काय घेणं देणं?''


**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**




आकाशामधुनी जाती इंद्रधनूची कमान ती ।
रम्य तारका लुकलुकती, शुभ्र चंद्रिका नाच करी ।।


वार्षिक देणगीदार - ➢ सौ. सीमा परांजपे, पुणे ➢ श्री. सचिन गाडगीळ, पुणे
➢ श्री. अतुल कुलकर्णी, पुणे. कै. सुशीलाताई कुलकर्णी यांचे स्मरणार्थ

# पक्षी

कविता

कोण शिकवितो या पक्ष्यांना
काडी काडी जमवायाला
कोण शिकवितो प्रातःसमयी
तान मधुर ती मारायाला ।।

तांब्या-भांडे कधीच नसते
घरट्यामध्ये या पक्ष्यांच्या
कशी भागते तहान यांची
वेळअवेळी अपरात्रीच्या ।।

टीव्ही फ्रीज अन् नसतो पंखा
नसे पांघरूण आणि अंथरूण
तरी नेहमी खुशीत दिसती
कोण करवितो यांचे पालन ।।

नसते कपाट नसती साड्या
चिमणा-चिमणी तरी आनंदी
कुठून येते मजला सांगा
जगण्यामध्ये यांच्या धुंदी ।।

वादळ वारा आणि संकटे
धैर्य येतसे यांच्या कामी
मला वाटते मनापासुनी
पक्षी व्हावे पुढल्या जन्मी ।।





– अनंत जोशी
anantraojoshi51@gmail.com

अपूर्णतेने पूर्ण निराशा, हृदयाची होते ।
अमृत मुखाशी नेता नेता, विषमय हो तेथे ।।

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. सायली मुळ्ये, अंधेरी, मुंबई ➢ श्री. संतोष साटम, पुणे
➢ श्री. विद्यानंद देवधर, कोल्हापूर ➢ श्रीमती केतकी आपटे, पुणे

## ज्ञान प्रबोधिनी – छात्र प्रबोधनतर्फे ‘जोडीकार्य स्पर्धा – ५’
### सौर वैशाख शके १९४८/ मे २०२६

### जोडीकार्य करा – अनुभवसमृद्ध व्हा! बक्षीस मिळवण्याची प्रत्येकाला संधी!
### या महिन्यासाठी जोडीने करायचे कार्य – ताक विक्री कार्य!

उन्हाळा जाणवायला लागला की, आपल्याला आठवण होते ती थंडगार ताकाची, हो ना? चला तर मग या महिन्यात आपण ताक विक्री कार्य करू या! तुम्ही स्वतः रोज घरी किमान ४ लिटर ताक बनवा आणि ते ताक तुमच्या सोसायटीत, समारंभात किंवा घराच्याजवळ किमान ३ दिवस स्टॉल लावून विका.

हे विक्री कार्य करण्यासाठी तुम्हाला काय-काय सामान लागेल? ते कोठून मिळवलं? किती लीटर ताक रोज विकलं गेलं, त्यातून किती नफा झाला? त्या नफ्याचं तुम्ही काय केलं/करणार? आणि हे कार्य पूर्ण करताना तुम्हाला आलेले अनुभव लिहून सोबत विक्री कार्य करतानाचे २ फोटो आणि चित्रफीत जोडून ‘जोडीकार्य स्पर्धा ५’ असे लिहून पाठवा.

ही जोडीकार्ये जानेवारी महिन्यापासून दरमहा देतो आहोत. तथापि फेब्रुवारी ते एप्रिल या तीन महिन्यातील जोडीकार्ये करायची राहिली असल्यास या सुट्टीचा उपयोग करून ती चारही कार्ये तुम्ही पूर्ण करा आणि आम्हाला chhatra.spardha@jnanaprabodhini.org या मेल आयडीवर २० जून २०२६ पर्यंत पाठवा.

सर्व जोडीकार्यांबद्दलचे अधिक तपशील, नियम व बक्षिसांची योजना सोबतच्या क्यू आर कोडमध्ये दिली आहे. ते वाचा आणि लागा कामाला!

जोडीकार्य तपशील

**सर्व बक्षिसांचे वितरण जानेवारी २०२७ मध्ये होईल.**

### ⁂ प्रतिसादी वाचकवीर स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे अभिनंदन! ⁂

खालील विद्यार्थ्यांनी (सौर फाल्गुन शके १९४७, वर्ष २६ अंक ६) हा अंक बारकाईने वाचत, अंकातील साहित्याचा आनंद घेत, अंकातील प्रश्नांची उत्तरे ‘छात्र प्रबोधन’कडे पाठवली आहेत. त्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक! त्यातील गुणवत्तापूर्ण उत्तरे लिहिलेल्या खालील विद्यार्थ्यांना बक्षीस (पुस्तकरूपाने) लवकरच पाठवण्यात येईल.

**१)** कु. ईश्वरी महाजन, (इ. ७ वी) **रचना विद्यालय, जि. नाशिक**
**२)** कु. तनूजा चौधरी, (इ. ७ वी) **प्रताप विद्यामंदिर, चोपडा, जि. जळगाव**

**१)** चि. अनिकेत कांबळे, (इ. ८ वी) **२)** कु. प्राची आडाव, (इ. ८ वी) **३)** कु. गोदावरी सातपुते, (इ. ८ वी)
**४)** कु. प्रथमेश नवटक्के, (इ. ८ वी) **सर्व विद्यार्थी–विद्यावर्धिनी विद्यालय, अहमदपूर, जि. लातूर**

**१)** कु. कार्तिकी जाधव (इ. ९ वी) **२)** कु. आरती काबंळे, (इ. ९ वी) **३)** कु. वैशाली चौगळे (इ. ७ वी)
**४)** कु. राणी हंकारे, (इ. ९ वी) **४)** कु. किर्तीका शिंदे, (इ. ८ वी)
**सर्व विद्यार्थी परशुराम विद्यामंदिर, गगनबावडा, जि. कोल्हापूर**

## प्रतिसादी वाचकवीर व्हा… (वर्ष २६/८)

**अंक बारकाईने वाचत व अंकातील साहित्याचा आनंद घेत दि. ३१ मे २०२६ पर्यंत**
**अंकातील प्रश्नांची उत्तरे** लिहून छात्र प्रबोधनकडे पाठवा… बक्षीस मिळवण्याची प्रत्येकाला संधी!

१. मृद्‌गंधाला एकाकी क्रिकेट या खेळाची भीती का वाटू लागली?
२. कवीला पुढच्या जन्मी पक्षी का व्हावेसे वाटते?
३. गोव्यामध्ये खास साजरे होणारे उत्सव कोणते? त्यातील कोणताही एका उत्सवाबद्दल अधिक जाणून घेऊन लिहा
४. समुद्राची खोली मोजण्याकरीता कोणत्या उपकरणाचा वापर करण्यात आला, त्या उपकरणाबद्दल अधिक माहिती मिळवा.
५. मराठी माध्यमाच्या शाळा चालू राहाण्यासाठी कोणते प्रयत्न व्हायला हवेत असं तुम्हाला वाटतं?
६. यावर्षी तुमच्या सुट्टीच्या नियोजनात कोणते वेगवेगळे उपक्रम तुम्ही निवडले व का ते आम्हाला लिहून पाठवा.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ वैशाख, शके १९४८, १ मे, २०२६ या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.
This magazine is owned by Jnana Prabodhini and is printed by Printer, Publisher and Editor Shri. Mahendra Sethiya, on Rashtriya Sour 11 Vaishakha Sake 1948/1st May 2026, printed at Prakash Offset, 82, Parvati Towers, Pune - 9 and published at Jnana Prabodhini, 510 Sadashiv Peth, Pune 30

## ✍ लिहिते व्हा! ✍

खालील चित्र पाहून तुमच्या मनात कोणते विचार येतात, ते १००-१५० शब्दांत लिहून/ स्वरचित कविता करून १५ जून २०२६ पर्यंत मेलद्वारे (इमेल पत्ता पान क्र. २८वर) आमच्यापर्यंत पोहोचवा. निवडक साहित्य अंकात प्रसिद्ध केले जाईल.





चित्रकार – कु. तिथी नवीन हरणे (इ. ७वी), विद्यानिकेतन कॉन्व्हेंट स्कूल, कसाल

**सौर वैशाख, शके १९४८/मे २०२६ पंजीकृत नियतकालिक,** ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
**प्रकाशन दिनांक : सौर ११ वैशाख, शके १९४८/१ मे २०२६**
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.) MAHMAR /2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (SDM/Pune/SR/139/2017)

# कुमारांच्या कुंचल्यातून...

ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचा दिनांक २० मे हा स्मृतिदिन ! त्यांना भावपूर्वक आदरांजली!!



कु. मनस्वी सारंग सूर्यवंशी, (इ. ८वी) बाल शिवाजी विद्यामंदिर, अकोला

**सभासदांनी वर्गणी भरताना आपला व्हॉटस्अॅप संपर्क क्रमांक नोंदवणे आवश्यक आहे, तसे केले नसल्यास ९०११११६१४४५ या भ्रमणभाषवर संपर्क क्रमांक लवकरात लवकर कळवावा. म्हणजे सभासदांशी वेळोवेळी संपर्क साधता येईल. स्पर्धा, उपक्रम, व्याख्याने, नवीन प्रकाशने यांची माहिती पोहोचवता येईल.**

छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित दिनदर्शिकेतील मे महिन्याचे पान, त्यातील प्रार्थना ऐका कथा वाचा, अभंग म्हणा, खेळ खेळा व आपल्या मित्र-मैत्रिणींना शिकवा, त्यातील समूहगायन व इतर स्पर्धांना प्रतिसाद द्या.

**सौर ➤ दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

**सौर दिनदर्शिका शके १९४७**

| | सौर वैशाख ज्येष्ठ | मे २०२६ |
|---|---|---|
| शु. | वै.११ | 1 |
| श. | १२ | 2 |
| र. | १३ | 3 |
| सो. | १४ | 4 |
| मं. | १५ | 5 |
| बु. | १६ | 6 |
| गु. | १७ | 7 |
| शु. | १८ | 8 |
| श. | १९ | 9 |
| र. | २० | 10 |
| सो. | २१ | 11 |
| मं. | २२ | 12 |
| बु. | २३ | 13 |
| गु. | २४ | 14 |
| शु. | २५ | 15 |
| श. | २६ | 16 |
| र. | २७ | 17 |
| सो. | २८ | 18 |
| मं. | २९ | 19 |
| बु. | ३० | 20 |
| गु. | ३१ | 21 |
| शु. | ज्ये. १ | 22 |
| श. | २ | 23 |
| र. | ३ | 24 |
| सो. | ४ | 25 |
| मं. | ५ | 26 |
| बु. | ६ | 27 |
| गु. | ७ | 28 |
| शु. | ८ | 29 |
| श. | ९ | 30 |
| र. | १० | 31 |

**संपर्क पत्ता :**
**छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी**
**५१० सदाशिव पेठ, पुणे** 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**वार्षिक वर्गणी : ₹ ४०० (दिवाळी अंकासह),**
**+ स्पीडपोस्ट/कुरिअरने अंक पाठविण्यासाठी अतिरिक्त खर्च ₹ ३००**

ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी व पुस्तक खरेदीसाठी : www.jpprakashane.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे, ही आग्रहाची, प्रेमळ विनंती.

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन